**ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम.**
१.माहे जानेवारी २०२१ ते नोव्हेंबर २०२१ मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १८४९ ग्रामपंचायती
२. माहे डिसेंबर २०२१ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ६७४७ ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित ग्रामपंचायती
३. आयोगाने प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेला कार्यक्रम चुकीच्या पध्दतीने राबविल्यामुळे सर्व निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या सर्व ग्रामपंचायती

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक : रानिआ/ग्रापंनि २०२०/प्र.क्र.४/का.८
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २६ नोव्हेंबर,२०२१

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ मधील तरतुदीनुसार :-

१. ग्रामपंचायतींच्या मुदत संपण्यापूर्वी निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात घेण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे;

२. आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्र. रानिआ/मनपा २००५/प्र.क्र.४/का.०५,दि. २७/०१/२००५ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेची मुदत ज्या महिन्यात संपत असेल त्याच्या सहा महिने अगोदरच्या कालावधीमध्ये, तिच्या क्षेत्रात व हद्दीमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत बदल करता येणार नाही.

३. आणि ज्याअर्थी, माहे जानेवारी २०२१ ते नोव्हेंबर २०२१ मध्ये सुमारे १८४९ ग्रामपंचायतीची मुदत संपली असून माहे डिसेंबर २०२१ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत राज्यातील सुमारे ६७४७ ग्रामपंचायतींच्या मुदती संपत आहेत.

४. आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका (स्टॅम्प) क्र.९५९६९/२०२० मध्ये दिनांक २७/११/२०२० रोजी दिलेल्या आदेशास मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका(special leave petition-civil) क्र. १४७६०/२०२० अन्वये आव्हानित करण्यात आले आहे.

५. आणि ज्याअर्थी,मा.सर्वोच्च न्यायालयाचे रिट याचिका क्र.९८०/२०१९ मध्ये दिनांक ४ मार्च २०२१ चे आदेशाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने, सन २०२१ चा अध्यादेश क्र.३ दिनांक २३ सप्टेंबर,२०२१ अन्वये महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १० (क) मध्ये सुधारणा केलेली आहे. त्यामुळे आयोगाच्या प्रभाग रचनेच्या सर्व आदेशात सुधारणा करुन प्रभाग रचना व आरक्षणाचे सर्वसमावेशक सुधारीत आदेश - ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण ) आदेश २०२१, दिनांक २४/११/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

६. आणि ज्याअर्थी, सदर अध्यादेश तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.९८०/२०१९ मध्ये दिनांक ४ मार्च २०२१ च्या आदेशामध्ये संपूर्णत: अनुसूचित क्षेत्रातील ना.मा.प्र. जागांच्या अनुषंगाने विसंगती असल्याने राज्य निवडणूक आयोगाने यासंदर्भात दिनांक २२/११/२०२१ च्या पत्रान्वये विसंगती दूर करण्याबाबत शासनास कळविले आहे. त्यामुळे संपूर्णत: अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींमध्ये जागांची गणना करताना राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही करावी लागणार आहे.

७. आणि ज्याअर्थी, ग्रामपंचायतींच्या निवडणुकांच्या मुख्य तीन टप्यांना (प्रभाग रचना व आरक्षण, प्रभागनिहाय मतदार यादीचे विभाजन व प्रत्यक्ष निवडणूक) लागणारा कालावधी लक्षात घेता प्रभाग रचना व आरक्षणाच्या कार्यवाहीस तात्काळ सुरूवात करावी लागणार आहे.

८. त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम १० अ (४) नुसार मिळालेल्या व इतर अधिकारांचा वापर करुन, खालील ग्रामपंचायतींचे प्रभाग रचना करणे व आरक्षण ठरविणे याकरीता आयोग आदेश देण्यात येत आहेत :-

i) **माहे जानेवारी २०२१ ते नोव्हेंबर २०२१ मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १८४९ ग्रामपंचायती**

ii) **माहे डिसेंबर २०२१ ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या सुमारे ६७४७ ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायती,**

iii) **आयोगाने प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेला कार्यक्रम चुकीच्या पध्दतीने राबविल्यामुळे सर्व निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या ग्रामपंचायती**

## आदेश

९. ग्रामपंचायतींच्या सर्व निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची असल्याने, त्यांनी राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशाप्रमाणे लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेऊन निवडणुका योग्यप्रकारे पार पाडाव्यात.

१०. **ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण ) आदेश २०२१, दिनांक २४/११/२०२१ मध्ये प्रभाग रचना व आरक्षण करण्याची सविस्तर कार्यपध्दती नमूद केलेली आहे. त्यानुसार लगतच्या जनगणनेनुसार प्रभागांची संख्या व सदस्य संख्या निश्चित करावी तसेच प्रभाग रचना करण्याची मार्गदर्शक तत्वे विचारात घ्यावीत. प्रारुप प्रभाग रचना तयार करुन त्यावर हरकती व सूचना मागविण्यात याव्यात. प्राप्त हरकती व सूचना विचारात घेऊन अंतिम प्रभाग रचना करण्यात यावी.**

११. सदर आदेशातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची दक्षता संबंधित जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसिलदार तसेच इतर संबंधितांनी घ्यावी.

१२.सोबत जोडलेल्या परिशिष्ट १ नुसार प्रभागरचना व आरक्षणाचा कार्यक्रम राबविण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( अविनाश सणस )
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**सहपत्र - परिशिष्ट १**

**प्रती** - १. प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन.

**उक्त कालावधीतील ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसंदर्भात अनुदानाची पर्याप्त तरतूद (मागील अनुदानाच्या थकबाकीसह) करण्याबाबत आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी. तसेच या पत्रात निर्देश दिल्यानुसार प्रभाग रचना व आरक्षणाच्या कार्यक्रमात ग्रामसेवकासह संबंधित गटविकास अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.) जिल्हा परिषद यांची सक्रिय भूमिका व जबाबदारी राहील, तसेच प्रारूप प्रभाग रचना गुगल मॅप नकाशांच्या सहाय्याने संयुक्त सर्वेक्षणाअंती तयार करण्यासंबंधात आवश्यक ते सर्व सहकार्य संबंधित तहसिलदार यांना उपलब्ध करून देतील, याबाबतचे निर्देश देणारे पत्र आपणाकडून तातडीने निर्गमित करण्यात यावे.**

२.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

३.विभागीय आयुक्त (सर्व),

४.जिल्हाधिकारी सर्व **(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)**

५.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)

नव्याने स्थापित ग्रामपंचायतींचा तपशिल दिनांक ३०/११/२०२१ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयास उपलब्ध करून देण्यात यावा. तसेच विशेष ग्रामसभेचे आयोजन विहीत वेळापत्रकानुसार करण्याची दक्षता घ्यावी.

६.माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

७.सर्व निवडणूक कार्यासने

८.निवड नस्ती.

## परिशिष्ट १

**आयोगाचे क्रमांक - रानिआ/ग्रापंनि २०२०/प्र.क्र. ४ /का.०८, दिनांक २६/११/२०२१ रोजीच्या आदेशासोबतचे सहपत्र**

**माहे जानेवारी २०२१ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या,नव्याने स्थापित तसेच आयोगाने प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेला कार्यक्रम चुकीच्या पध्दतीने राबविल्यामुळे सर्व निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रम.**

| अ.क्र. | प्रभाग रचना व आरक्षणाचा टप्पा | कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| | **प्रारुप प्रभाग रचना तयार करणे** | |
| १ | i) तहसिलदार यांनी गुगलअर्थ चे नकाशे super impose करुन प्रत्येक गावाचे नकाशे अंतिम करणे | ३/१२/२०२१ |
| | ii)संबंधित तलाठी व ग्रामसेवक यांनी संयुक्त स्थळ पाहणी करुन प्रभाग पाडणे, सीमा निश्चित करणे व अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीचे आरक्षण निश्चित करणे | ०९/१२/२०२१ |
| | iii)तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने प्रारुप प्रभागरचनेची तपासणी करणे. सदर समितीमध्ये गटविकास अधिकारी व संबधित मंडळ अधिकारी यांचा समावेश असेल. | १३/१२/२०२१ |
| | iv)सदर समितीने **प्रारुप प्रभाग रचनेचा** प्रस्ताव उपविभागीय अधिकारी यांच्यामार्फत जिल्हाधिकारी यांच्या मान्यतेसाठी सादर करणे | १६/१२/२०२१ |
| | v) जिल्हाधिकारी **यांनी नमुना ब (प्रारुप प्रभाग रचना व आरक्षण)** ची संक्षिप्त तपासणी करणे व त्यात आवश्यक असल्यास दुरुस्त्या करणे व मान्यता देणे | २१/१२/२०२१ |
| | vi) या दुरुस्त्या अंतर्भूत करुन प्रारुप प्रभाग रचना व आरक्षणाला (अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीतील महिलांसह) तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखालील समितीने मान्यता द्यावी व समितीच्या सर्व सदस्यांनी स्वाक्षरी करावी. | २४/१२/२०२१ |
| | vii) विशेष ग्रामसभेची सूचना देणे ( आरक्षणाची सोडत काढण्याकरीता ) | २७/१२/२०२१ |
| | viii) विशेष ग्रामसभा बोलवून, तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली, प्रारुप प्रभाग रचनेवर आरक्षणाची सोडत ( अनूसूचित जाती, अनुसूचित जमातीतील महिलांसह) काढणे | ३१/१२/२०२१ |
| | **प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती व सूचना मागविणे** | |
| २ | i)प्रारुप प्रभाग रचनेला ( नमुना ब) व्यापक प्रसिध्दी देऊन तहसिलदार यांनी हरकती व सूचना मागविण्यासाठी जाहिर सूचना प्रसिध्द करण्याचा अंतिम दिनांक | ०३/०१/२०२२ |
| | ii) प्रारुप प्रभाग रचनेवर हरकती सादर करण्याचा अंतिम दिनांक | १०/०१/२०२२ |
| | iii) प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचना सुनावणीसाठी उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर करणे | १२/०१/२०२२ |
| | iv) प्राप्त झालेल्या सर्व हरकती व सूचनांवर उपविभागीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे | १९/०१/२०२२ |
| | v) आलेल्या प्रत्येक हरकती व सुचनांवर सुनावणीनंतर अभिप्राय नोंदवून अंतिम निर्णयासाठी प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे | २४/०१/२०२२ |
| | **प्रभाग रचना अंतिम करणे** | |
| ३ | i) उपविभागीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेले प्रस्ताव तपासून जिल्हाधिकारी यांनी प्रभाग रचना व आरक्षणाला अंतिम मान्यता देणे व स्वाक्षरी करणे | २८/०१/२०२२ |
| | ii) जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला (नमुना अ मध्ये) व्यापक प्रसिध्दी देणे | ०२/०२/२०२२ |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( अविनाश सणस )
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र